आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१४ जुलै २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्राला जगाचं आर्थिक विकासाचं शक्तीकेंद्र बनवण्याचं लक्ष्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- मुंबईतल्या, २९ हजार ४०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी

- चौथ्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात झिम्बाब्वेचं भारतापुढं विजयासाठी १५३ धावांचं लक्ष्य

**आणि**

- मुंबई, पुणे आणि कोकणाला पावसाचा तडाखा / मुंबई आणि पुणे जिल्ह्याला आज आणि उद्या रेड अलर्ट, तर पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी

**<><><><><>**

महाराष्ट्राला जगातलं आर्थिक विकासाचं सर्वात मोठं शक्तीकेंद्र आणि फिन्टेक राजधानी बनवणं हे आपलं हे आपलं स्वप्न असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मुंबई इथं झालेल्या कार्यक्रमात २९ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**होल्ड बाईट... प्रधानमंत्री**

आज सुरू केलेल्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारने ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदराच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे, यातून राज्यात १० लाख रोजगार निर्माण होतील असं ते म्हणाले.

महाराष्ट्र पर्यटनात देशात पहिल्या क्रमांकांचं असावं हीच आपली इच्छा असल्याचं ते म्हणाले. महाराष्ट्राला शिवाजी महाराजांचे किल्ले, कोकणचे मनमोहक समुद्र किनारे, सह्याद्रीचे रोमांचक पर्वतरांगेचा वारसा लाभला आहे, इथे परिषदा आणि वैद्यकीय पर्यटनाच्या मोठ्या संधी आहे, असं त्यांनी सांगितलं.

येत्या काळात महाराष्ट्र भारतात विकासाची नवी गाथा रचणार आहे आणि आपण त्याचे सहप्रवासी असणार आहोत असे ते म्हणाले.

देशाच्या जनतेला वेगानं विकास हवा असून, येत्या २५ वर्षात विकसित भारत घडवण्याचं स्वप्न ते पाहात आहेत, यात मुंबई - महाराष्ट्राची भूमिका सर्वात महत्वाची असेल, त्यामुळेच इथलं जीवनमान सुधारावं उंचवावं हेच आमचं स्वप्न असून, त्यासाठीच मुंबईच्या आसपासच्या दळवळण सुविधांमध्ये मोठ्या सुधारणा घडवण्याचे प्रयत्न केले जात आहेत असं त्यांनी सांगितलं. वेळची बचत आणि पर्यावरणाचं हीत साधत आम्ही मुंबईतल्या दळवणसुविधांना आधुनिक स्वरुप देण्याचं काम करत असल्याचं ते म्हणाले.

दहा वर्षांपूर्वी मुंबईत ८ किलोमिटरचे मेट्रोमार्ग होते ते आता ८० किलोमीटर झाले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री राज्यात आले की प्रगती आणि विकासाची दार उघडतात. सर्व सामान्य माणसाचं आयुष्य सुखकर करणे हा मोदींचा अजेंडा आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबई इथं झालेल्या कार्यक्रमात आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतल्या २९ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित विविध प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण, पायाभरणी झाली त्यावेळी ते बोलत होते. यात ठाणे - बोरिवली बोगदा, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, कल्याण यार्डाची पुनर्रचना, नवी मुंबईमध्ये तुर्भे इथं गतिशक्ती मल्टीमोडल कार्गो टर्मिनलची निर्मिती यांची पायाभरणी याचा समावेश आहे. याशिवाय प्रधानमंत्र्यांनी राज्य सरकारच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेला सुरुवात केली. लोकमान्य टिळक टर्मिनस इथला नवा फलाट तसंच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वरच्या विस्तारित १० आणि ११ क्रमांकाच्या फलाटाच लोकार्पण त्यांनी हस्ते झालं.

राज्य सरकारच्या विविध प्रकल्पांचे प्रस्ताव कुठल्याही कपातीशिवाय मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री एनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्र्याचं आभार मानले. आणखी कष्ट करून आगामी विधानसभा निवडणूकीत महायुतीला विजयी करू असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या प्रकल्पांमुळे मुंबईकरांचा वेळ वाचणार आहे. त्यामुळे गरीब कल्याणासह पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी इतिहासात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नाव लिहिले जाईल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले. तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्यांदाच राज्यात आल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं. राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय मंत्री पियूष गोयल, रामदास आठवले, राज्यातले मंत्री दीपक केसरकर, मंगल प्रभात लोढा हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><>**

सर्वसामान्य लोकांना कायद्याची मुलतत्त्वे जर सोप्या भाषेत समजाऊन देता आली नाहीत तर तो कायदे शिक्षण आणि कायद्याच्या व्यवसायामधला दोष आहे. असं सरन्यायाधीश धनंजय चंद्रचुड यांनी म्हटलं आहे. ते आज लखनौमधे डॉ. राममनोहर लोहिया राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात बोलत होते. कायद्याचं शिक्षण प्रादेशिक भाषेत मिळायला हवं यावर त्यांनी भर दिला. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते.

**<><><><>**

झिम्बाब्वेमधे हरारे इथं सुरु असलेल्या चौथ्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात झिम्बाब्वेनं भारतापुढं विजयासाठी  १५३ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

झिम्बाब्वेनं निर्धारित २० षटकात ७ गडी गमावून १५२ धावा केल्या. कर्णधार सिंकदर रझानं सर्वाधिक ४६ धावा केल्या. भारतातर्फे खलिल अहमदनं २, तर तुषार देशपांडे, वाशिंग्टन सुंदर, अभिषेक शर्मा, आणि शिवम दुबे, यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ११ षटकात बिनबाद ११५ धाव्या झाल्या होत्या.

**<><><><>**

**मुंबई, पुणे** आणि आसपासच्या भागात आज सकाळपासून पाऊस सुरु असून मुंबईत पावसाने जनजीवन प्रभावित झालं आहे. मुंबईत मध्य आणि हार्बर रेल्वेवरील काही

गाड्या उशीराने धावत आहेत. हवामान विभागानं मुंबई आणि पुणे जिल्ह्यात आज आणि उद्या रेड अलर्ट जारी केला आहे. पावसामुळे **मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी** सह अनेक ठिकाणच्या सखल भागात पाणी साचलं आहे. अंधेरी, मिलन सबवे आणि मालाड सबवे मध्ये पाणी साचल्यानं हे मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. पुणे विभागात हलका ते मध्यम पाऊस सुरु असून उदयाही असाच पाऊस पडणार असून त्यामुळे हवामान विभागानं **रत्नागिरी** आणि **सिंधुदुर्ग** जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**पालघर** जिल्ह्यातल्या डहाणू, पालघर, बोईसर, जव्हार सह अनेक भागांत जोरदार पाऊस सुरु असून नद्यांनाही पूर आला आहे. सुर्या नदी दुथडी भरून वाहात असून डहाणूतल्या कंक्राडी रेल्वे पुलाखाली पाणी भरल्यानं डहाणू कोसबाड रस्ता बंद ठेवण्यात आला आहे.

**रायगड** जिल्ह्यात काल रात्रीपासून जोरदार पाऊस कोसळत असल्यानं दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. ठाणे जिल्ह्यात गेली दोन दिवस काहीशी उघडीप घेतलेल्या पावसानं शुक्रवारी रात्री पासून ठाण्यात पुन्हा दमदार हजेरी लावली आहे. आज सकाळ पासूनच पावसानं आपला जोर कायम ठेवला आहे. त्यामुळं शहरातील सखल भागात पाणी साचलं आहे.

**<><><><><>**

सात राज्यांमधल्या तेरा विधानसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीसाठीचे निकाल जाहीर झाले आहेत. पंजाबमधल्या जालंधर पश्चिम मतदारसंघात आम आदमी पार्टीचा उमेदवार विजयी झाला आहे. हिमाचल प्रदेशमधल्या देहरा आणि नलगढ मतदारसंघात काँग्रेसच्या, तर हमीरपूरमध्ये भाजपा उमेदवाराने विजय मिळवला आहे. पश्चिम बंगालमधल्या रायगंज, बागडा, रणघाट दक्षिण, आणि मणिकताल या चारही मतदारसंघांमधून तृणमूल काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. मध्य प्रदेशातल्या अमरवाडामध्ये भाजपा, तर उत्तरखंडमधल्या बद्रीनाथ आणि मंगलौरमध्ये काँग्रेसचे उमेदवार जिंकले. बिहारच्या रुपौली इथं अपक्ष उमेदवार शंकर सिंह विजयी झाले असून, तमिळनाडूतल्या विक्रवंडीमध्ये द्रमुकच्या उमेदवारानं विजय मिळवला आहे. १० जुलै रोजी या निवडणुकीसाठी मतदान झालं होतं.

**<><><><><>**

गोंदिया जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांकडून रब्बी हंगामात केलेल्या खरेदीची रक्कम अदा करण्यासाठी ६५ कोटी रुपयांचा निधी जिल्हा विपणन महासंघाच्या खात्यात वर्ग केला गेला आहे. यानंतर आता येत्या सोमवार पासून धान्याच्या खरेदीचा परतावा संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरीत केला जाणार आहे.

**<><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मभूमी महू अध्यक्ष आणि अखिल भारतीय भिकू संघाचे अतिरिक्त सचिव महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भदंत प्रा. डॉ. सुमेधबोधि महाथेरो यांचं काल दीर्घ आजारानं निधन झालं. यवतमाळ जिल्ह्यात वटफळी इथं काल महाबोधी बुद्ध विहाराच्या प्रांगणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><>**

राज्यात येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. राज्यात तुरळक ठिकाणी खूप जोरदार तर काही मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

**//<><><><>//**